पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८
भूमि आणि जिंदगी विभाग
जा.क्र.भूजि/१ /कावि/ ५० /२०१९-२०
दिनांकः- २८/०१/२०२०

प्रति,
क्षेत्रिय अधिकारी
कार्यकारी अभियंता
अ / ब / क / ड / ई / फ / ग / ह क्षेत्रिय कार्यालय

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतीमधील घुसखोरी / अतिक्रमणाबाबत कार्यवाही करणेकरणे बाबत..

संदर्भ – १) प्रशासन/१/कावि/७७७/९५, दि. २६/१०/१९९५
२) प्रशा/१/कावि/७५७/१९९७, दि. ७/८/१९९७
३) भुजि/१/कावि/२०९/९९, दि. २६/२/९९
४) भुजि/१/कावि/२२६अ/२००४, दि. २८/०४/२००४
५) भुजि/५/कावि/२९४/२००६, दि. ११/०५/२००६
६) भुजि/३/कावि/१४१/२००८, दि. १/१२/२००८
७) भुजि/३/कावि/१५२/२००८, दि. २६/१२/२००८
८) भुजि/३/कावि/१५/२००९, दि. २०/१२/२००९
९) भुजि/२/कावि/५५७/२००९, दि. ०१/०६/२००९
१०) भुजि/६/कावि/८९८/२००९, दि. २६/११/२००९
११) प्रशा/१/कावि/१९५/२०११, दि. २४/०५/२०११
१२) भुजि/१/कावि/३१४/२०१३, दि. ०२/०८/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेच्यावेळी मनपा कार्यक्षेत्रात येणा-या मालमत्ता मनपाचे ताब्यात होत्या. त्या विविध विभागाचे वापरात होत्या. १९९५ पुर्वी मनपाचे अ आणि ब विभागात कामकाज होते.

आयुक्त यांचेकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/७७७/१९९५, दि.२६/१०/१९९५ अन्वये अ/ब/क/ड या चार प्रभाग समित्या स्थापन करुन त्यासाठी प्रभाग अधिकारी नियुक्त करणेत आलेल्या आहेत. त्यांना क्षेत्रिय स्थरावर कामकाज पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांनी क्षेत्रिय अधिका-यांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

आ) कलम ३३४ नुसार मनपा मंडई, बाजार मालात असलेल्या कोणत्याही उपविधी, स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल सदर जागेतून काढून टाकता येईल.
ब) कलम २५१ नुसार महापालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास ते वसुल करणे.
क) महापालिकेचे शाळा मैदाने भाड्याने देणे.
ड) कलम १८६ नुसार अधिनियमाच्या तरतुदी, नियम किंवा उपविधी यांचे उल्लंघन करण्याच्या किंवा मंजुरी न घेतलेल्या कृत्यांना मनाई करणे.
ई) कलम ८१ ब ,क, ड, ई, ह,ज नुसार मनपाच्या मालमत्तातुन काढून टाकणे व अनुषंगीक कार्यवाही

क्षेत्रिय कार्यालयांची निर्मीती झाल्यानंतर कार्यक्षेत्राप्रमाणे कामकाजानुसार कागदपत्र त्या त्या विभागात परस्पर हस्तांतरीत झालेली आहेत. तर १९९६ मध्ये नव्याने भुमि आणि जिंदगी विभागाची स्थापना झाले नंतर प्राप्त झालेल्या मिळकतींचे मिळकत नोंद रजिस्टरवर नोंद घेऊन इमारतीच्या प्रयोजनानुसार त्या त्या विभागाचे ताब्यात इमारती हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत.

उदा. १) शाळा इमारती- शिक्षण विभाग
२) दवाखाने – वैद्यकिय विभाग
३) क्रिडा विषयक इमारती – क्रिडा विभाग

४) वाचनालये- वाचनालय विभाग

५) उद्याने – उदयान विभाग

६) सर्व प्रकारच्या मिळकती- क्षेत्रिय कार्यलयाचे क्षेत्रानुसार क्षेत्रिय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध इमारती / व्यापारी संकुले / भाजी मंडई गाळे वितरीत करुन मासिक भाडे वसुलीकामी क्षेत्रिय कार्यालयांना वेळच्यावेळी कळविणेत आलेले आहे. त्याचे वेळच्यावेळी भाडे वसुली होणे त्यामध्ये घुसखोरी / अतिक्रमण होऊ नये यादृष्टीने क्षेत्रिय अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ८१(ब) नुसार अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत.

महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता / मिळकती क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये आहेत. त्यामध्ये अनाधिकृतपणे घुसखोरी, अतिक्रमण, झाल्याच्या तक्रारी मिळकतींचा विनापरवाना वापर चालू असले बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

याबाबत वेळोवेळी लेखी पत्र / आदेश / परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले असून अधिकारी बैठकामध्ये समक्ष सुचना देणेत आलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या मिळकतींबाबत नागरिकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी सारथी ( MA / ZR , RTI ) तसेच आपले सरकार , पंतप्रधान पोर्टल इत्यादीच्या माध्यमातून विविध तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यावर कारवाई करणेकामी संबंधित विभागाने तसेच क्षेत्रिय कार्यालयाने कारवाई करणे आवश्यक असताना सदर जागेचा ताबा आमच्या विभागाकडे नाही, आमचा या कामाशी सबंध नाही त्याची कागदपत्रे नाहीत अशा कारणाने त्या तक्रारी विनाकारण वेगवेगळ्या विभागाकडे वर्ग केल्या जातात. त्यामुळे सारथी ( MA / ZR , RTI ) या उपक्रमाचा उद्देश सफल होत नाही.

तरी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व मिळकतीमधील अतिक्रमण , घुसखोरी, विनारपवाना वापर या विरुध्द क्षेत्रिय अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांनी नियंत्रण ठेवायचे आहे. तर ज्या विशिष्ठ कार्यालयाचे अखत्यारीत असलेल्या उपक्रमाच्या मिळकतीवर संबंधित विभाग प्रमुखाची नियंत्रण ठेवण्याची जबाबदार राहील संबंधितांनी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाशी परस्पर समन्वय ठेवून मनपाच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण , घुसखोरी, विनारपवाना वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८